**पुणे महानगरपालिका**
**मा. प्रशासक**
**पुणे महानगरपालिका**

**नगरसचिव कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
**दिनांक:३१/०५/२०२४**

**<u>पुणे महानगरपालिका</u>**
**<u>स्थायी समिती</u>**
**<u>दाखल कार्यपत्रिका</u>**

**विषय क्र.६३ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमाखर्चाचा विचार करता र.रु.१५०.०० कोटी १२ महिने, ३६५/३६६ दिवस, ६ महिने/१८१ दिवस किंवा त्यापेक्षा कमी/जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रु.१५०.०० कोटी ३०% प्रमाणे मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.संकीर्ण- २०२४/प्र.क्र.१४/नवि-०४, दि.१४/०२/२०२४ नुसार राष्ट्रीयकृत बँकांसोबत ज्या खासगी बँका र.रु.१६००० कोटी पेक्षाजास्त नक्त मूल्य असणाऱ्या व Reserve Bank Of India यांच्या Domestic Systemically Important Banks च्या यादीत नावे असणाऱ्या खासगी बँकांमध्ये किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुंतवणूक करणेस, गुंतवणुकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/मुले/६१,दि.२९/०५/२०२४ चे पत्र.

**विषय क्र.६४ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमाखर्चाचा विचार करता र.रु.३५०.०० कोटी १२ महिने, ३६५/३६६ दिवस, ६ महिने/१८१ दिवस किंवा त्यापेक्षा कमी/जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रु.३५०.०० कोटी ७०% प्रमाणे मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.संकीर्ण- २०२४/प्र.क्र.१४/नवि-०४, दि.१४/०२/२०२४ नुसार राष्ट्रीयकृत बँकांसोबत ज्या खासगी बँका र.रु.१६००० कोटी पेक्षाजास्त नक्त मूल्य असणाऱ्या व Reserve Bank Of India यांच्या Domestic Systemically Important Banks च्या यादीत नावे असणाऱ्या खासगी बँकांमध्ये किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुंतवणूक करणेस, गुंतवणुकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/मुले/६२,दि.२९/०५/२०२४ चे पत्र.

**विषय क्र. ६५त्वर्य**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.१, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६/०३/२०२४ ते दि.३१/०३/२०२४ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.१/६३, दि.३०/०५/२०२४ चे पत्र.

**विषय क्र. ६६त्वर्य**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.२, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०३/२०२४ ते दि.३१/०३/२०२४ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.२/६४, दि.३०/०५/२०२४ चे पत्र.

**विषय क्र. ६७त्वर्य**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.२, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०२/२०२४ ते दि.२९/०२/२०२४ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.२/६५, दि.३०/०५/२०२४ चे पत्र.

**विषय क्र. ६८त्वर्य**

दिनांक ०६/०५/२०२४ ते १२/०५/२०२४ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ४२ आगींबाबत मा. अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/६६, दि.३१/०५/२०२४ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. ६९त्वर्य**

पुणे शहरासाठी राबविण्यात येणाऱ्या भामा – आसखेड पाणीपुरवठा योजनेअंतर्गत सिंचन पुनर्स्थापना खर्च करणेसाठी खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पा.पु./६७, दि.३१/०५/२०२४ चे पत्र.

१. पुणे पाटबंधारे मंडळाने मागणी केल्याप्रमाणे पुर्नवसन खर्च वजा जाता सिंचन पुर्नस्थापना खर्चाची र.रू. १५३.११ कोटी पाटबंधारे विभागास टप्प्या टप्प्याने अदा करणेस.

२. सदरचा खर्च अदा करणेसाठी सन २०२४-२५, २०२५-२६ व २०२६-२७ चे अंदाजपत्रकामध्ये तरतूद करणेस.

**विषय क्र.७०त्वर्य**

मौजे वडकी व अंतर्गत वाड्या ता. हवेली जि. पुणे या भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे कामी खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पापु/७०, दि.३१/०५/२०२४ चे पत्र.

१) मौजे वडकी व अंतर्गत वाड्या ता. हवेली जि. पुणे यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०१ अन्वये शहराबाहेर रामटेकडी टँकर पॉइंट वरून टँकर भरून देणेस.

२) सदर भरून दिलेल्या पाण्याचा खर्च पुणे मनपा मान्य दर र.रु. ६६७ प्रति १० KL प्रमाणे पंचायत समिती हवेली या कार्यालयामार्फत भरून घेणेस.

**विषय क्र.७१त्वर्य**

श्री. अंबरिष रतिकांत गालिंदे (मुख्य लेखापरीक्षक पुणे महानगरपालिका) यांचे सेवानिवृत्ती वेतन व तदनुषंगिक रक्कमांबाबत खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/७१, दि.३१/०५/२०२४ चे पत्र.

१) निवृत्तीवेतनाचा तपशील व तदनुषंगिक रक्कमा मा. महा. आयुक्त यांच्या विषयपत्रातील तक्ता १ नुसार अदा करणेस.

२) भविष्यात कोणत्याही कारणास्तव त्यांचे मूळ वेतनात / निवृत्तीवेतनात बदल झाल्यास त्यानुसार निवृत्तीवेतन व निवृत्तीवेतनाचे लाभ सुधारित करण्यास व त्यानुसार रकमांमध्ये बदल झाल्यास अतिरिक्त रक्कम अदा / मनपाकडे परत जमा करणेस.

**प्र.नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**